जा.क्र.उमाशि-३/११ वी प्रवेश/पुवि/२०१३/१५३८८
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : ३१/५/२०१३

प्रति

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे

---

विषय : इयत्ता ११ वी केंद्रिय प्रवेश सन २०१३-१४
प्रवेश अर्जातील माहिती अद्ययावत करणेबाबत.

संदर्भ :- १) दिनांक ९/१/२०१३ च्या प्रवेश समिती बैठक.
२) दिनांक २६/२/२०१३ ची कार्यकारी समिती बैठक.
३) कार्यालयाचे परिपत्रक समक्रमांक दिनांक ८/३/२०१३
४) दिनांक ४/५/२०१३ चे स्मरणपत्र.

दिनांक ८/३/२०१३ च्या परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील इयत्ता ११ वी केंद्रीय प्रवेशासाठी सर्व कनिष्ठ महाविद्यालयांची प्रवेशाबाबतची अद्ययावत माहिती विहित नमुन्यातील फॉर्म मध्ये भरुन समितीकडे सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे ज्या कनिष्ठ महाविद्यालयाने दिनांक ३/५/२०१३ पर्यंत माहिती सादर केली नाही अशा कनिठ महाविद्यालयांना माहिती सादर करणेबाबत पुन्हा समितीमार्फत कळविण्यात आले होते.

सादर केलेल्या प्रवेशाच्या माहिती मध्ये ब-याच कनिष्ठ महाविद्यालयांनी अनुदानीत तुकडयांची फी ही माध्यमिक शाळा संहितेतील नियमास अनुसरुन दिलेली नाही. त्यामुळे सदरची माहिती प्रवेश अर्जात नमूद करण्याबाबत अडचणी निर्माण झाल्या आहेत. काही कनिष्ठ महाविद्यालयांनी फक्त महिन्याची फी दर्शविली आहे तर काही महाविद्यालयांनी माध्यमिक शाळा संहितेतील नियमानुसार नमूद केलेल्या फी पेक्षा जास्त फी नमूद केली आहे. त्यामुळे दिनांक ३१/५/२०१३ सायं ५.०० वाजपर्यंत अनुदानित फी बाबतची योग्य ती माहिती समितीकडे सादर करावी. त्याचप्रमाणे ज्या कायम विना अनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयांनी फी नमूद केलेली नाही त्यामुळे सदर कनिष्ठ महाविद्यालयांनी सुध्दा त्यांचे कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांचेकडे आकारण्यात असलेली फी च्या तपशीलासह माहिती समितीकडे दिनांक ३१/५/२०१३ सायं ५.०० पर्यंत सादर करावी.

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या (**www.dydepune.com**) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(सुमन शिंदे)
अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत - माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
प्राचार्य, आबासाहेब गरवारे महाविद्यालय कर्वेरोड, पुणे ४
उपप्राचार्यां, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे ४
२/- कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त माहिती संकलित करुन समितीकडे सादर करावी.
सर्व केंद्रिय प्रवेश समिती सदस्य
श्री / श्रीमती . . . . . . . . . . . . . . . . . .